# कामोठयाच्या समस्या सोडविण्यासाठी पाठपुरावा करणार
# जनता दरबारात आमदार प्रशांत ठाकुर यांची ग्वाही.

पनवेल (प्रतिनिधी) कामोठे परिसरातील नागरीकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे हे प्रश्न सोडविण्यासाठी कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून पाठपुरावा करून कामोठेकरांच्या सदैव पाठीशी राहू अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकुर यांनी कामोठे येथे दिली. कामोठे नागरीक विकास संघाच्या वतीने सेक्टर १९ येथील महालक्ष्मी मैदानावर कामोठे परिसरातील समस्यांवर चर्चा करण्यासाठी "जनता दरबार" कार्यक्रमाचे आयोजन रविवारी (दि.१९) करण्यात आले होते. यावेळी आमदार प्रशांत ठाकुर बोलत होते.

नागरीकांच्या प्रश्नांना उत्तर देताना आमदार प्रशांत ठाकुर म्हणाले की, कामोठे परिसरातील समस्या सतत वाढतच आहेत त्याचे निराकरण करण्यासाठी कॉंग्रेस पक्ष कटीबद्ध आहे. असे सांगून आज नागरीकांनी उपस्थित केलेल्या समस्यांच्या सोडवणूकीबाबत आढावा घेण्यासाठी संबधिंत विभागांचे अधिकारी बोलवून पुन्हा एकदा अश्याच प्रकारचे जनता दरबार भरवू त्यामूळे सर्वच अडचणींवर उपाय योजना करता येईल असे ही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी कामोठे शहर वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीराम मुल्लेमवार, वरिष्ठ निरीक्षक आर.डी.आढांगळे, सिडकोचे कार्यकारी अभियंता विलास बनकर, माजी ग्रामपंचायत सदस्य गोपिनाथ भगत, कामोठे शहर अध्यक्ष गोपीनाथ गोवारी, कामोठे ग्रामपंचायत सदस्य प्रदीप भगत, दिलीप पाटील, मालती गोवारी, रूपाली गोवारी, ज्येष्ठ नेते गोपीनाथ भगत, उत्तम गायकवाड, सुनिल पाटील, मनाजी पाटील, रमेश तुपे, डॉक्टर्स असोशिएशनचे अध्यक्ष डॉ.अरूण भगत, कामोठे शहर डॉक्टर्स सेलचे अध्यक्ष डॉ.विजय पाटील, कामोठे नागरीक विकास संघाचे अध्यक्ष सचिन गायकवाड, उपाध्यक्ष काशीनाथ पिलाणे, खजिनदार प्रधान देशमुख, भास्कर ढवळे, कामोठे शहर अनुसूचित जाती विभागाचे प्रमोद रायबोले, तालुका उपाध्यक्ष माया अहिरे, कामोठे शहर महिला अध्यक्षा दिक्षा जगताप, स्त्री शक्ती महिला मंडळाचे अध्यक्षा स्वप्नाली म्हात्रे, ज्योती रायबोले, साईकिरण कॉम्प्लेक्सचे अध्यक्ष गुंडा गायकवाड, सेक्रेटरी अरूण ढोबळे, उपाध्यक्ष तुकाराम वाक्षे, युवा नेते महेंद्र भोपी, हॅप्पी सिंग, विजय दळवी, संजय तुर्भेकर, नवनाथ कदम, सुभाष नवले, योगेश खडतर, निलेश भागवत, गेणू वाफारे आदी मान्यवरांसह महिला व नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.

जनता दरबारात फेरीवाल्यांचे अतिक्रमण, फुटपाथ व गटारांवरील उघडे व तुटलेले झाकण, बस परिवहन सेवा अग्निशमन केंद्र, पेट्रोल व सी.एन.जी पंप, रेल्वे तिकीटघर, कचरा निर्मुलन, घंटा गाडी, मच्छर डास प्रतिबंधक औषध व धुर फवारणी, सर्व्हीस टॅक्स, रस्ते, रूग्णालय, आरोग्य, शासकीय अर्बन हेल्थ सेंटर, पोस्ट ऑफीस, सुलभ शौचालय, वीजबील भरणा केंद्र, कायदा सुव्यवस्था, चोऱ्या, सुरक्षारक्षक, पाणी गळती, भाजी मार्केट, सिडको आकारीत असलेले व्हॅट, बगीचा, बलात्कार विरोधी कारवाई, मध्यम वर्गीयांसाठी शैक्षणिक संकुल, टॅक्सी, रिक्षा, बिल्डर्सकडून होणारी फसवणूक, सी.सी.टिव्ही कॅमेरा, सी.एन.जी घरगुती गॅस, ग्रामसभा आदी प्रश्नांबाबत नागरीकांनी निवेदने व सुचना आमदार प्रशांत ठाकुर तसेच शासकीय अधिकारी यांच्या समोर उपस्थित केल्या यामध्ये सार्वजनिक व मुलभूत प्रश्नांवर भर देण्यात आला. यावर झालेल्या प्रश्नोत्तरे व चर्चेनंतर अधिकाऱ्यांकडून लवकरात लवकर समस्या सोडविण्याबाबत आश्वासन देण्यात आले तर बहुतांशी प्रश्नांबाबत नागरीकांनी समाधान व्यक्त केले.